ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 55
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख १६ जुलै, १९५२ | अंक २९

## विविध माहिती

**उत्तर प्रदेशांतील भिकारी**—उत्तर प्रदेशांतील भिकाऱ्यांची संख्या गेल्या वीस वर्षांत ५७,००० नी कमी झाली आहे असें समजतें. १९३१ सालीं भिकाऱ्यांची संख्या १,५९,७७५ होती. आतां १,०२,७४९ भिकारी आहेत. त्यांपैकीं ७५,३२९ पुरुष आणि २७,४२० स्त्रिया आहेत.

**हिंदी परिचारिकांना शिक्षण**—ऑस्ट्रेलियानें १०० हिंदी परिचारिकांना शिक्षण देण्याचें कबूल केल्याचें वृत्त अ. भारतीय महिला परिषदेच्या चिटणीस, श्रीमति कामेश्वरम्मा. ह्यांनीं प्रगट केलें आहे.

**१७ कोटी रुपयांचें रेल्वेचें सामान**—भारतीय सरकारतर्फे १७ कोटी रुपयांचीं रेल्वे एंजिनें आणि इतर यंत्रसामुग्री ह्यांच्या मागण्या युरोपमधील आणि ब्रिटनमधील कारखान्यांतून नोंदण्यांत येणार आहेत. भारतांत रेल्वेचे डबे बांधण्याचा एक कारखाना उघडण्याची खटपटहि करण्यांत येत आहे.

**रशिआची व्यापारी स्पर्धा**—पाकिस्तानला पाहिजे असणारें १,३०,००० टन सिमेंट पुरविण्याचें कंत्राट मिळविण्यांत रशिआला यश आलें आहे. हें सिमेंट पुरवण्यासाठी पोलंड, बेल्जम आणि जपान ह्यांचीहि खटपट चालू होती. पण रशिआचा सौदा पाकिस्तानला अधिक सोईचा वाटला.

**डेन्मार्कनें रशिआला तेल-बोट दिली**—डेन्मार्क रशिआसाठीं कांहीं बोटी बांधत आहे. त्यांपैकीं १३,००० टन वजनाची एक तेलवाहू बोट नुकतीच रशिआच्या स्वाधीन करण्यांत आली. ह्यासंबंधींचा करार १९४८ सालीं, म्हणजे अमेरिकेनें प. युरोपिय देशांच्या पूर्व-युरोपीय देशांशीं चालणाऱ्या व्यापारावर बंधनें घालण्यापूर्वीच, झालेला आहे. म्हणून तो डेन्मार्कवर बंधनकारक नाहीं असें मानलें जात आहे.

**मॉस्कोमधील भारतीय वकिलात**—मॉस्कोमधील भारतीय वकिलातीच्या इमारतीचा भाडेपट्टा चालू वर्षअखेर संपणार असल्याची नोटीस रीतीप्रमाणें देण्यांत आली आहे. त्यानंतर वकिलात नवीन इमारतींत जाईल. ही इमारत म्हणजे एक जुना राजवाडा असून मॉस्कोच्या पुनर्घटनेंत तो आतां नष्ट करण्यांत येणार आहे.

**हृदयविकाराचें कारण**—हृदयविकारांबाबत डॉक्टरांचा सल्ला घेण्यास आलेल्यांपैकीं ४० ते ५० टक्के लोकांना निष्कारण अगर अतिरंजित काळजी वाटत असते, असें मत एका तज्ज्ञ डॉक्टरनें व्यक्त केलें आहे. डॉक्टरांनीं रोग्यांशीं बोलतांना खोटी भीति निर्माण न करण्याची दक्षता घ्यावी, असें ते म्हणतात.

**जाहिरातीवरील सरकारी खर्च**—भारतीय सरकारनें १९५१ सालीं जाहिरातीसाठी म्हणून ६,७२,५२७ रुपये खर्च केले. भारतांतील वृत्तपत्रांतून सरकारतर्फे ६,००० जाहिराती प्रसिद्ध करण्यांत आल्या. ६४·४ टक्के जाहिराती देशी भाषांतून निघणाऱ्या आणि ३५·६ टक्के जाहिराती इंग्रजींतून निघणाऱ्या वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्यांत आल्या.

**नव्या बोटीचा वितरण-समारंभ**—विशाखापट्टम् येथील गोदींत बांधण्यांत आलेल्या १० व्या मालवाहू बोटीचा वितरण समारंभ नियोजन-मंत्री श्री. गुलझारीलाल नंदा ह्यांच्या हस्तें झाला. त्यावेळीं पुरोहितांनीं वेदाच्या ऋचा म्हटल्या.

**खेळाच्या मेळाव्यासाठी मदत**—भारतीय संघांना ऑलिंपिक गेम्समध्यें भाग घेतां यावा म्हणून मध्यवर्ती सरकारनें १,२५,००० रुपये मंजूर केले आहेत. त्यांपैकीं ४३,००० रुपये इंडिअन हॉकी फेडरेशनला मिळणार असून १५,००० रुपये अॅथलेटिक फेडरेशन ह्या संस्थेला मिळणार आहेत.

**प्राप्तीवरील कराची चौकशी प्रकरणें**—दडवलेल्या प्राप्तीकराची चौकशी करणाऱ्या कमिशननें आतांपर्यंत एकूण ७७९ प्रकरणें निकालांत काढलीं आहेत. ह्या सर्व प्रकरणांत मिळून ३७·१२ कोटी रुपये उत्पन्न छपविण्यांत आलें होतें. त्यावर १९·६१ कोटी रुपये कर वसूल करण्यांत आला. अजून ७७६ प्रकरणांचा निकाल लागावयाचा आहे.

**जंगल सरकारी मालकीचें झालें**—१ जुलैपासून उत्तर-प्रदेशांतील जमीनदारी रद्द करण्यांत आली. त्यामुळें १,५०० एकर खाजगी मालकीचें जंगल सरकारच्या मालकीचें झालें आहे. उत्तर-प्रदेशांत जंगलांचें एकूण क्षेत्रफळ १०,५०० चौरस मैल आहे.

**बँकेचें नांव बदलणार**—ब्रिटिश बँक ऑफ पर्शिआ अँड दि मिडल ईस्ट ह्या बँकेचें नांव १६ जुलै रोजीं बदलण्यांत येऊन तें ब्रिटिश बँक मिडल ईस्ट असें ठेवण्यांत येईल. बँकेनें इराणमधील आपल्या सर्व शाखा बंद केल्या आहेत. फक्त तेहरानमधील शाखा अजून चालू आहे आणि तीहि ३० जुलै नंतर नवा धंदा करणार नाहीं.

**लाटांच्या शक्तीनें चालणारी बोट**—समुद्रांतील लाटांच्या शक्तीनें चालणारी एक बोट ब्रिटिश नाविक एंजिनिअर्सनीं तयार केली आहे. तिची प्रायोगिक सफर पुढील महिन्यांत काढण्यांत येईल.

**रशिआंतील कापसाचें पीक**—सोव्हिएट रशिआंत चालू सालच्या कापसाच्या हंगामांत भारत, पाकिस्तान व इजिप्त ह्या राष्ट्रांच्या एकूण उत्पादनापेक्षांहि अधिक कापूस पिकला, असें समजतें. रशिआंत अलीकडेच जे नवे कालवे खणण्यांत आले त्याच्यामुळें कापसाच्या उत्पादनांत वाढ झाली.

**बायका अधिक बोलतात**—अमेरिकन मानसशास्त्रज्ञांनीं केलेल्या एका तपासणींत असें आढळून आलें आहे कीं, आपल्या लैंगिक जीवनाविषयीं पुरुषापेक्षां स्त्रिया आपलीं रहस्यें अधिक बोलून दाखवितात. एका डॉक्टरनें आपल्याकडे औषध घेणाऱ्या रोग्यांत वरील प्रमाण १० स्त्रियांशीं एक पुरुष पडतें,असें सांगितलें.

**स्वातंत्र्य-दिनाच्या दिवसाचे अपघात**— ४ जुलैला अमेरिकेंत स्वातंत्र्यदिन साजरा करण्यांत आला. त्यावेळीं झालेल्या उत्सवप्रसंगीं ३७७ लोक मरण पावले. त्यांपैकीं २३१ वहातुकींतील अपघातानें, ९८ बुडून, ७ विमान कोसळल्यामुळें आणि २ दारूकाम पहातांना, आणि २९ इतर कारणांमुळें मृत्यु पावले.

**जर्मनीच्या कॅमेऱ्यांचा धंदा**—युद्धांत व युद्धोत्तरकाळीं बसलेला जर्मन कॅमेरे तयार करण्याचा धंदा आतां १९३९ सालाच्या अवस्थेपर्यंत पुन्हां आला आहे. दरवर्षी १० लाख कॅमेरे आतां तयार होऊं लागले असून त्यापैकीं ६ लाख निर्यात करण्यांत येतात. अमेरिका सर्वांत अधिक कॅमेरे विकत घेते.

**पाकिस्तानला निर्यात होणारीं फळें**— भारतामधून पाकिस्तानला निर्यात होणारीं फळें आतां बरीच कमी जाऊं लागलीं आहेत. पाकिस्ताननें फळांच्या आयातीवर ३६ टक्के जकात आणि ३॥ टक्के विक्रीकर बसविला आहे. ह्या करांमुळें व जकातीमुळें भारतीय फळांच्या किंमती लाहोरमध्यें ५० टक्क्यांनीं वाढल्या आहेत.

**पेकिंगमध्यें रशिआचें रुग्णालय**—पेकिंग शहरांत रशिअन रेड-क्रॉस संस्थेनें एक रुग्णालय उघडल्याची बातमी आहे. ह्या रुग्णालयांतील वैद्यकीय आणि व्यवस्थापकीय नौकरवर्ग संपूर्णतः रशिअन आहे असें समजतें.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

**॥ केल्यानें होत आहे रे ॥ 'समर्थ'**

नवीन मशिनरीनें

**ता. ३०-६-५२ पर्यंत ७६,००० पोतीं साखर तयार झाली**

— अद्याप ३८५ एकर ऊंस गळिताकरितां आहे —
त्यामुळें आणखी एक महिना कारखाना चालेल.

ठेवीबरोबर कांहीं शेअर घ्यावेत
या योजनेमुळें नवीन शेअर येऊन

**पंचवीस लक्ष रुपयांचें सव्वीस लक्ष रुपये**
**शेअर-भांडवल झालेलें आहे.**

**महाराष्ट्रीयांच्या व्यवहारशास्त्राप्रमाणें**
—भांडवल स्वीकारावें लागतें—

शेअरविक्री चालू आहे.

शेअर व ठेवीचे फॉर्म कंपनीच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

कॉमनवेल्थ बिल्डिंग,
९८० सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड,
पुणें २.
दि. १ जुलै १९५२.

**चंद्रशेखर गोविंद आगाशे,**
बी. ए., एलएल्. बी.,
सी. जी. आगाशे ॲण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स.

# अर्थ

बुधवार, ता. १६ जुलै, १९५२



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पाकिस्तानच्या सद्यःपरिस्थितीची आर्थिक पार्श्वभूमि

पाकितानतर्फे भरविण्यांत येऊं पहाणारी मुसलमान राष्ट्रांच्या मुख्य-मंत्र्यांची परिषद दोनदां तहकूब करण्यांत आली. ह्याच सुमारास पाकिस्तानची आर्थिक परिस्थितीहि बिघडूं पहात असल्याचीं चिन्हें दिसत आहेत. मुसलमान राष्ट्रांच्या राजकारणांत पाकिस्ताननें नेतेपणानें पुढाकार घ्यावा अशी तेथील कांहीं लोकांची वृत्ति होती. मि. लिआकत अलिखान ह्यांच्या खुनानंतर ह्या वृत्तीच्या लोकांनीं अधिकच उचल खाल्लेली दिसली. मुसलमान राष्ट्रांची मध्यपूर्वेत जी सांखळी आहे तीमधील महत्त्वाच्या दुव्याचें स्थान मिळविण्याचा पाकिस्तानचा हेतु फारसा यशस्वी न झाल्यामुळें त्या सरकारचें लक्ष आतां घरच्या तातडीच्या प्रश्नांकडे वळलेलें दिसून येत आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणासंबंधीं पाकिस्तानचा जो मोहेरेपालट झाला आहे त्याला त्या देशांतील आर्थिक परिस्थितीहि थोड्याफार अंशानें कारणीभूत झालेली आहे. गेलीं दोन वर्षे पाकिस्ताननें आपलें आर्थिक धोरण कांहींसें साहसपूर्ण असें आंखलें होतें, आणि नशिबानें त्याला हातहि चांगला दिला होता. अलीकडे कांहीं महिन्यांत मात्र वारे निराळ्या दिशेनें वाहूं लागले आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारांत पाकिस्तान जो माल पिकवतो त्या मालाच्या थप्प्या लागून राहिल्या आहेत. ज्या मालाची चणचण अजूनहि भासतच राहील असा पाकिस्तानचा अंदाज होता तो माल बाजारांत सहज मिळूं लागल्यामुळें पाकिस्तानचें आर्थिक धोरण आतां वास्तववादी होऊं लागलें आहे. ह्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी पाकिस्तान सरकार अजूनहि जलदीनें पावलें उचलित आहे असें नाहीं. सरकारी यंत्रणा ही अशीच दिरंगाईची असते असा अनुभव आहे. पण व्यापारांतील बिनसरकारी तज्ज्ञ आणि कांहीं सरकारी अधिकारी ह्यांना बिघडत चाललेल्या आर्थिक परिस्थितीची चांगली कल्पना आहे. निर्यातीवरील जकातीपैकीं बराच मोठा भाग रद्द केला नाहीं तर पाकिस्तानच्या रुपयाची किंमत कमी करावी लागेल हें त्यांना स्पष्टच दिसत आहे. जकातीचें उत्पन्न सोडावें कीं रुपयाचें अवमूल्यन करावें, असा बिनतोड प्रश्न आतां निश्चितपणें उभा राहिला आहे. लोकरीवरील निर्यात-कर पाकिस्ताननें कमी केलाच आहे. पण तरीसुद्धां भारतीय लोकरीशीं किंमतींत स्पर्धा करण्याचें पाकिस्तानला जड जाईल. कारण, भारतीय रुपयाचें अवमूल्यन पूर्वीच झालें असल्यामुळें भारतीय लोकरीच्या किंमती कमी आहेत. चहाच्या निर्गतीची कथाहि अशीच आहे. पाकिस्तानच्या गेल्या अंदाजपत्रकाच्या वेळीं चहावरील निर्यातजकातहि थोडीशी कमी करण्यांत आली आहेच. कच्चीं व कमावलेलीं कांतडीं ह्यांना फारच थोडें परदेशी गिऱ्हाईक आहे आणि आखूड धाग्याचा कापूस तर कोणी हातांतच धरत नाहीं. ताग आणि लांब धाग्याचा कापूस ह्यांचा बाजारहि मंदावला आहे. ह्या मालाच्या किंमती इतक्या पडल्या आहेत कीं कांहीं ठराविक किंमतीला तो घेण्याचें सरकारनें ठरविलें आहे म्हणूनच केवळ तागाचे शेतकरी व व्यापारी जीव धरून आहेत.

पाकिस्ताननें तेजीच्या बाजाराचा जेवढा फायदा मिळवता येणें शक्य होतें तितका मिळविला आहे. पाकिस्तानच्या निर्यातीच्या मालाची वाजवी किंमत ठरण्याचा काळ आतां मात्र जवळ आला आहे असें दिसतें.

---

## मुंबई राज्यांतील ग्रामोद्योग

भारतीय सरकारनें निरनिराळ्या घटक-राज्यांतील ग्रामोद्योगांचा आढावा घेणारा एक खास अहवाल तयार केला आहे. सदर अहवालांत राज्यांतील ग्रामोद्योगासंबंधींची माहिती सुसंगत रीतीनें ग्रथित करण्यांत आली आहे. मुंबई राज्यांत जे ग्रामोद्योग सध्यां चालू आहेत त्यांत हातमागाचा धंदा बराच प्रगत झालेला दिसून येतो. अर्थातच तो सर्वांत अधिक महत्त्वाचा ठरतो. राज्यांत एकूण १,६१,२५५ हातमाग आहेत आणि १५,३२० यांत्रिक माग आहेत. ही संख्या इतर कोणत्याहि राज्यांतील संख्येपेक्षा अधिक आहे. हातमागाच्या धंद्याच्या खालोखाल महत्त्वाच्या अनुक्रमानें पुढील श्रेणी लागते. कातडीं कमावणें, तेल गाळणें, हातानें कागद तयार करणें, हस्तीदंतावर, शिंगावर आणि लाकडावर नक्षीकाम करणें, वेताचें काम करणें आणि भांडीं तयार करणें. राज्यांतील सहकारी चळवळहि बरीच विकास पावल्याचें अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे. एकूण १,२४८ उत्पादकांच्या सहकारी संस्थांपैकीं ४७९ विणकरांच्या आहेत आणि १८५ कांतडीं कमावणारांच्या आहेत. सहकारी संस्थांना जिल्हा औद्योगिक संघटनांचें स्वरूप प्राप्त झालेलें आहे. त्याचबरोबर जिल्हा आणि विभाग ह्यांच्यावर आधारलेल्या औद्योगिक बँकाहि मुंबई राज्यांत आहेत. शिवाय, प्रांतिक औद्योगिक संघटनाहि आहेतच. येत्या पांच वर्षांत ग्रामोद्योगांच्या विकासासाठीं १,०३,००,००० रुपये खर्च करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. भारतीय सरकारनें ग्रामोद्योगांसाठीं २० लाख रुपये मंजूर केले आहेत.

---

### फाउंटनपेनचा कारखाना

मद्रासजवळ १० मैलांवर, हिंदी-जपानी सहकार्यानें फाउंटनपेनचा एक कारखाना काढण्यांत येणार आहे. दरसाल ३० लक्ष पेनें तयार करण्याचा चालकांचा बेत आहे. पहिलें पेन येत्या जानेवारींत विक्रीसाठी बाहेर पडेल.

---

**अमेरिकेचा नवा अणु-कारखाना**— अमेरिका १,१९,७३,५०,००० डॉलर्स खर्चून एक नवा अणु-शक्तीचा कारखाना बांधणार आहे. त्याशिवाय सध्या चालू असलेल्या दोन कारखान्यांचा विस्तार करण्यासाठीं १,५०,००,००,००० डॉलर्स खर्च करण्यांत येणार आहेत.

## बँकांविषयीं तपशीलाचे तक्ते

### रिझर्व्ह बँकेचें वार्षिक प्रकाशन

१९५१ वर्षासंबंधींचा, बँकिंग कंपनीज ॲक्टाच्या ३६ ( २ ) ह्या कलमाखालील रिझर्व्ह बँकेचा अहवाल कांहीं आठवड्यांपूर्वी प्रसिद्ध झाला, त्याचा परामर्श "अर्था"च्या ११ जून, १९५२ च्या अंकांत घेण्यांत आला होता. भारतांतील बँकांबाबत तपशीलवार तक्त्यांचें १९५१ सालविषयक रिझर्व्ह बँकेचें वार्षिक पुस्तक आतां प्रसिद्ध झालें आहे. त्यांत, उपरिनिर्दिष्ट अहवालांतील कांहीं माहिती पुनः आली असली, तरी तपशीलवार तक्ते हें त्याचें वैशिष्ट्य असून, हिंदी बँकिंगचा सूक्ष्म अभ्यास करणें त्यामुळें शक्य होतें. तक्त्यांपैकीं प्रारंभींच्या सारांशात्मक तक्त्यांत वेगवेगळ्या प्रकारच्या बँकांच्या महत्त्वाच्या येण्या-देण्याचें दिग्दर्शन केलेलें असून, प्रत्येक बँकेच्या येण्या-देण्याचे विस्तारपूर्वक आंकडे तपशीलवार तक्त्यांत दिलेले आहेत.

१९५१ सालीं बँकांकडील ठेवी घटल्या, कर्जें वाढलीं व त्यामुळें बँकांची सरकारी रोख्यांतील गुंतवणूक घटून बँकांना मोठ्या प्रमाणावर व्यवहार करणें कठीण गेलें, हें सुप्रसिद्धच आहे. त्यासंबंधांत रिझर्व्ह बँकेनें केलेली उपाययोजनाहि "अर्था" च्या वाचकांच्या परिचयाचीच आहे. जॉइंट स्टॉक बँका व मोठ्या सहकारी बँका ह्यांचेकडील ठेवींत १९५१ मध्यें २६ कोटी रुपयांची घट होऊन, त्यांनीं दिलेल्या कर्जांत मात्र १२२ कोटी रुपयांची वाढ झाली. शेड्यूल्ड बँकांकडील ठेवी ३४ कोटी रुपयांनीं कमी झाल्या, बिगर-शेड्यूल्ड बँकांकडील ठेवींत ३ कोटी रुपयांचा उतार झाला, तर सहकारी बँकांकडील ठेवी १० कोटी रुपयांनीं वाढल्या. कर्जांच्या वाढींत मात्र सर्व बँका भागीदार झाल्या—शेड्यूल्ड बँका १०९ कोटी रु., बिगर-शेड्यूल्ड बँका ६५ लक्ष रु. व सहकारी बँका ११ कोटी रु. एकूण बँकांपैकीं संख्येनें एक दशांश असलेल्या शेड्यूल्ड बँकांकडे एकूण ठेवींपैकीं ८३% ठेवी असून कर्जांचें प्रमाणहि जवळजवळ तेवढेंच आहे. सरकारी रोख्यांतील गुंतवण व रोख रकमा ह्यांचे बाबतींत सहकारी बँका अपवाद ठरून, त्यांची गुंतवण वाढली व रोख रकमांत घट झाली नाहीं. बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या मानानें सहकारी बँकांचें बँकिंग क्षेत्रांतील महत्त्व वाढत चाललें आहे.

### चहाच्या खपापेक्षा पुरवठा जास्त

१९५१ सालीं चहाचा जागतिक पुरवठा १२१ कोटी पौंड होता. १९५० सालीं तो ११७ कोटी पौंड होता. १९३४–३८ मधील सरासरी पुरवठा ९८ कोटी पौंड होता.

चहाचा जागतिक खप १९५१ मध्यें ११७ कोटी पौंड झाला. १९५० मध्यें तो ११० कोटी पौंड, १९४९ मध्यें तो ११३ कोटी पौंड व १९३४–३८ मध्यें सरासरीनें ९७ कोटी पौंड होता.

१९४९ मध्यें पुरवठ्यापेक्षां खप जास्त झाल्यानें, ३ कोटी पौंडांचा तुटवडा पडला होता. १९५० मध्यें खपापेक्षा पुरवठा ६ कोटी पौंड जास्त होता; १९५१ मध्यें तो ४ कोटी पौंड जास्त होता.

---

### भारताची परदेशांतील गुंतवणूक

| | लक्ष रु. |
|---|---|
| ग्रेट ब्रिटन | ९,२५ |
| ब्रह्मदेश | ५,९५ |
| पाकिस्तान | १३,८८ |
| मलाया | ७८ |
| सिलोन | २,८८ |
| युनायटेड स्टेटस | ५५ |
| फ्रेंच इंडो चायना | ७ |
| ब्रि. आफ्रिका | २,०३ |
| ऑस्ट्रेलिया | ९७ |
| हाँगकाँग | ६७ |
| एडन | ४७ |
| कॅनडा | ४४ |
| द. आफ्रिका | १३ |
| नेदरलंड्स | ८ |
| न्यूझीलंड | ६ |
| बेल्जम | ६ |
| फ्रेंच आफ्रिका | १५ |
| इतर देश | ४० |
| एकूण | ३८,७७ लक्ष रुपये |

## सर्व प्रकारच्या बँकांच्या कचेऱ्यांची लोकसंख्येवार वर्गवारी ( १९५१ )

| गांवाची लोकसंख्या | अशीं गांवें | इंपीरिअल बँक | इतर हिंदी शेड्यूल्ड बँका | विदेशी शेड्यूल्ड बँका | एकूण शेड्यूल्ड बँका | बिगर शेड्यूल्ड बँका | सहकारी बँका | एकूण | प्रत्येक कचेरीस किती लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १०,००,००० वर | ३ | १६ | २६९ | ४२ | ३२७ | ७३ | ७१ | ४७१ | १४,४७५ |
| ५ लक्ष ते १० लक्ष | ६ | १३ | १८६ | १२ | २११ | ३४ | ३८ | २८३ | १६,२२९ |
| २ लक्ष ते ५ लक्ष | २५ | ३६ | २५३ | ५ | २९४ | ८५ | ५६ | ४३५ | १६,४३१ |
| १ लक्ष ते २ लक्ष | ४५ | ४५ | २५५ | ३ | ३०३ | १७१ | ४९ | ५२३ | ११,२३३ |
| ७५ हजार ते १ लक्ष | २३ | १८ | ८१ | १ | १०० | २६ | २५ | १५१ | १२,८५४ |
| ५० हजार ते ७५ हजार | ७२ | ४४ | १९६ | — | २४० | १३० | ६३ | ४३३ | १०,०३८ |
| २५ हजार ते ५० हजार | १९६ | ७८ | ३३२ | २ | ४१२ | १८७ | ९३ | ६९२ | ९,८११ |
| १० हजार ते २५ हजार | ५१३ | ९७ | ४२७ | — | ५२४ | ३६६ | २०० | १,०९० | ७,६७० |
| ५ हजार ते १० हजार | ३१५ | २४ | १२४ | — | १४८ | १९७ | १२५ | ४७० | ५,०१८ |
| ५ हजार खालीं | २२१ | १९ | ५९ | — | ७८ | १४० | ५९ | २७७ | २,४४१ |
| एकूण | १,४१९ | ३९० | २,१८२ | ६५ | २,६३७ | १,४०९ | ७७९ | ४,८२५ | १०,१३७ |
| वर्गवारी न केलेलीं गांवें | १५० | ३ | ७ | — | १० | ९५ | ५८ | १६३ | |
| एकूण | १,५६९ | ३९३ | २,१८९ | ६५ | २,६४७ | १,५०४ | ८३७ | ४,९८८ | |

## लोणी येथील सहकारी साखर कारखाना

" लोणी येथील ही साखर सहकारी संस्था अहमदनगरमधील प्रवरा कालव्याचा टापूंत येते. सुमारें ३९ खेडीं या कारखान्याचे कार्यक्षेत्रांत येतात. शेतीच्या भरभराटीसाठी हा विभाग पूर्वी हंगामांत आणि मान्सून पावसावर अवलंबून होता. तथापि येथें पाटबंधाऱ्यांची सोय झाल्यावर बाहेरील अनेक शेतकरी येऊं लागले. तेव्हांपासून या भागाची भरभराट साखरेच्या किंमतींतील चढउतारावर अवलंबून आहे. १९४७ मध्यें येथील प्रमुख शेतकऱ्यांनीं सहकारी पद्धतीनें एक हंगामी योजना आंखून जवळ जवळ २ लाख रुपयांचें भांडवल जमविलें आणि या संस्थेची सरकारकडे नोंदणी केली. एकदां वापरलेलें यंत्र मिळण्याचे प्रयत्न अपेशी ठरल्यानें ४५० टन शक्तीचें एक स्कोडा यंत्र मागविण्यांत आलें, तथापि रुपयाच्या अवमूल्यनानंतर हें यंत्र इथें येतांच त्याची किंमत किती तरी वाढली होती.

"या योजनेस सुरुवातीला २१ लाख रुपये भांडवली खर्च येण्याची अपेक्षा होती. परंतु हा खर्च प्रत्यक्षांत ३२ ते ३६ लाख रुपयांपर्यंत जाईल असें नंतर स्पष्टपणें दिसूं लागलें. मुंबई सरकारनें यावेळीं या संस्थेस वसूल झालेल्या भांडवलाइतकें परंतु जास्तींत जास्त ६ लाख रुपयांपर्यंत भांडवल देण्याचें कबूल केलें. तसेंच इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशननेंहि त्यास २० लाख रुपये कर्जाऊ दिले. १९५०-१९५१ चें वर्ष आर्थिकदृष्ट्या अनपेक्षितपणें फायद्याचें गेल्यानें कामगारांस बोनस देऊन व विकास निधीस सुरुवात करूनहि ८ लाख रुपये घसारा व ३ लाख रुपये डिव्हिडंड जाहीर करतां आलें. सरकारचे शेअर्ससुद्धां जून १९५१ मधील खपलेलें भांडवल १७ लाख रुपये होतें; त्यांतील १६ लाख रुपये वसूल झालेलें भांडवल होतें.

" कालांतरानें या संस्थेचें आर्थिक स्वरूप हळूहळू बदलत जाऊन त्यास सांघिक जीवनाचें स्वरूप आलें. १९५० च्या अखेरीस गुळाच्या किंमती अतिशय वाढत होत्या, कारखाना तर बांधून झालेला नव्हता आणि साखर तयार करण्याचें काम सुरू होण्यास किती वेळ लागेल हेंहि अनिश्चित होतें. अशा वेळीं या लोकांची कसोटी लागली. तथापि बहुतेक सर्व लोकांनीं आर्थिक नुकसानी सोसून उसापासून गूळ काढण्याचें टाळलें. शहरी जीवनाचा दृष्टीकोन असलेले येथील तांत्रिक नोकर आणि ग्रामीण जीवन जगणारे शेतकरी व मालक यांच्या संबंधाचे प्रश्नहि हळूहळू सोडविले जात आहेत. सहकारी प्रयत्नांत कामगारांनींहि भाग घेण्याकडे अधिक लक्ष पुरविलं जात आहे. ":— ध. रा. गाडगीळ, इंडियन लेबर गॅझेट, मे १९५२.

---

### जपानचा पंचवार्षिक कार्यक्रम

जपाननें आपली आर्थिक घडी सुस्थिर करण्यासाठी एक पंचवार्षिक कार्यक्रम आखला आहे. तो अंमलांत आणण्यास भारताची महत्त्वपूर्ण मदत होईल, असें जपानी उद्योगपतींना वाटत आहे. आग्नेय आशिआंतील राष्ट्रें, भारत आणि फिलिपाइन्स ह्यांच्या कच्च्या मालाचें उत्पादन वाढविण्यास जपान भांडवल व तांत्रिक माहिती पुरविणार आहे. कच्च्या मालाच्या वाढत्या उत्पादनानें जपानी कारखान्यांची गरज भागविण्याचा हेतु ह्या योजनेमागें आहे. उलट, हे देश जपानकडून पक्का माल विकत घेतील. ह्या योजनेला अमेरिकेचा पाठिंबा आहे असें म्हणतात. सुमारें ३.३ कोटी पौंड भांडवल गुंतविण्याची जपानची तयारी आहे. ह्या भांडवलापैकीं बराच मोठा भाग इंडोनेशिआंत गुंतविला जाणार आहे. इंडोनेशिआंतील कोळसा, निकेल, लोखंड, लाकूड इत्यादि उद्योगांत तें बहुधा गुंतविलें जाईल. सध्यां जपानला लोखंडाची माती अमेरिकेकडून, भारी किंमत देऊन विकत घ्यावी लागते. त्यापेक्षां ती भारताकडून घेणें जपानला अधिक परवडेल. कार्यक्रमाच्या तिसऱ्या वर्षी भारताकडून १५ लाख टन माती मिळेल असा जपानचा अंदाज आहे. फिलिपाइन्सकडूनंही लोखंडाची माती, तांबे आणि मॅंगेनीज मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत. त्याशिवाय हाँगकाँग, मलाया आणि गोवा येथनहि लोखंडाची माती मिळविण्याच्या खटपटी चालू आहेत. रोज १,२०० टन बिडाचें लोखंड तयार करणारी एक भट्टी बांधण्याच्या वाटाघाटी भारतांतील एका मोठ्या कंपनीबरोबर चालू आहेत.

---

### लिव्हर हाउसची उभारणी व मांडणी, कार्यक्षमतेस पोषक

लक्स, लाइफबॉय, पेप्सोडेंट, इत्यादींचे कारखानदार लिव्हर ब्रदर्स, ह्यांच्या नव्या कचेरीच्या "काचेच्या" इमारतीचें बांधकाम नुकतेंच पुरें झालें. ह्या २४ मजली इमारतीस ६० लक्ष डॉलर्स खर्च आला. ह्या इमारतींत दुसऱ्यास भाड्यानें जागा देण्याचा प्रश्नच नसल्याकारणानें, तिला तळमजलाच ठेवण्यांत आलेला नाहीं; त्याऐवजीं वरती एक मजला वाढविणें तितकेंच स्वस्त किंवा महाग होतें. तळमजल्याचे जागीं सार्वजनिक बाग करण्यांत आली आहे! सुखसोई व कार्यक्षमता ह्यांस प्राधान्य मिळेल. अशा रीतीनें इमारतीची रचना करण्यांत आली आहे. दुसरा मजला, म्हणजे बागेची शोभा जेथून लुटतां येईल असा बाल्कनीवजा लाऊंज आहे. तिसरा मजला गच्चीवजा आहे. उन्हांतील ३५% उष्णता शोषून घेणाऱ्या काचांचीं सर्वत्र तावदानें आहेत. उजेडांतील तीव्रता नाहींशी करणारे रंग भिंतींना देण्यांत आले आहेत. जमीन व तक्तपोशी हीं आवाज शोषून घेणारीं आहेत. कामांचें कोणतेंहि टेबल खिडकीपासून २५ फुटांपेक्षां दूर नाहीं आणि प्रत्येक नोकराच्या सोईप्रमाणें त्याच्या टेबलाची उंची कमीज्यास्त करतां येते. कामाच्या दृष्टीनें इमारतीची मांडणी केलेली आहे, त्याचा सुपरिणाम कार्यक्षमता वाढण्यांत तात्काळ दिसून आला; त्याच नोकरांचे हातून पूर्वींच्या जागेपेक्षां ह्या नवीन जागीं ३५% काम अधिक होतें, असा अनुभव आहे.

---


पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें शहर

## नोटीस

या बँकेच्या सन १९५२-५३ सालाच्या हिशेबाची तपासणी करण्याकरितां येत्या वार्षिक साधारण सभेनें दोन हिशेब तपासनिसांची नेमणूक करावयाची आहे. तरी सदर जागासाठीं ज्यांस उमेदवार म्हणून उभें रहावयाचें असेल त्यांनीं आपले अर्ज बँकेच्या पुणें कचेरींत दिनांक ३१ जुलै, १९५२ रोजीं दुपारीं चार वाजण्यापूर्वीं दाखल होतील अशा बेतानें पाठवावेत. उमेदवारानें अर्जांत आपलें संपूर्ण नांव, पत्ता व लायकी अवश्य नमूद करावी. हिशेब तपासनिसांच्या नेमणुकीसंबंधीं बँकेनें केलेले नियम तिचे मुख्य कचेरींत कामाचे वेळांत पहावयास मिळतील.

पुणें, १० जुलै, १९५२.

मो. वि. खडे
मॅनेजिंग डायरेक्टर.

## साखर कारखान्यांच्या जमिनीचा खंड

महाराष्ट्रांतील साखरकारखाने आणि त्यांना खंडानें ज्यांनीं जमिनी दिल्या आहेत त्यांचे मालक, ह्यांचेमध्यें खंडाची मुदत वाढविण्याबाबत तंटा निर्माण होत आहे. त्यासंबंधांत मध्यस्ती करण्याची तयारी मुंबई सरकारनें दर्शविली आहे. बेलापूर साखरकारखाना व जमीन मालक ह्यांचेमधील तंट्यांत मध्यस्ती करण्यास मुंबई सरकारनें अहमदनगरच्या कलेक्टरांना सांगितलें आहे. मार्च, १९५३ अखेर ज्यांच्या खंडाची मुदत संपत आहे, अशा जमिनींच्या मालकांनीं कंपनीला त्यांत ऊंस न लावण्याबद्दल कळविलें आहे. १९६१ नंतर ज्यांच्या खंडाची मुदत संपते, अशा जमिनींतहि लागवड होण्यास आडकाठी करण्यांत आली आहे. जमीनमालकांनीं असें कृत्य करूं नये, आणि त्याबरोबरच साखर कारखान्यांनीं तडजोडीसाठीं थोडी उदार वृत्ति दाखवावी, असें सरकारनें सांगितलें आहे. ह्या तंट्यासंबंधांतील पूर्वइतिहास लक्षांत आल्याखेरीज, त्याचें स्वरूप नीट ध्यानांत येणार नाहीं. म्हणून तो येथें देत आहों.

### थोडा पूर्व इतिहास

बेलापूर साखरकारखान्यानें सुमारें ४००० एकर जमीन या भागांतील ९ गांवच्या शेतकऱ्यांपासून खंडानें घेतली आहे. खंड एकरीं २ ते १० रु. पर्यंत आहे. कायद्याचे भाषेंत, शेतसाऱ्याचे १० पट खंड आहे. खंडरोख्याची मुदत मार्च ५३ मध्यें संपते. जमीनमालकांनीं यापुढें आपल्या जमिनी कंपनीकडे ठेवावयाच्या नाहींत म्हणून नोटीसा दिल्या, कंपनी बंद पडूं नये म्हणून या जमिनींत ऊंस तयार करून तो सरकारी दरानें कंपनीस विकण्याचीहि त्यांनीं तयारी दाखवली आहे. परंतु करारनाम्यांत अशी अट आहे कीं, कंपनीची इच्छा असल्यास याच खंडावर आणखी ३० वर्षें कंपनी आपल्याकडे जमिनी ठेवूं शकते व पुढेंही आणखी ३७ वर्षें हा करार लांबवूं शकते. म्हणजे एकंदर ८७ वर्षें जमिनींचा ताबा न सोडण्याची कायदेशीर सोय आहे. त्यामुळें मालकाच्या ताब्यांत जमिनी द्यावयास कंपनी तयार नाहीं.

परंतु, खंडवाढ वगैरेसारख्या मुद्यावर कांहीं तडजोड होऊं शकत असल्यास सरकार, कॉंग्रेस कमेटी व या भागांतील जमीनमालक यांच्यांत बोलणीं चालू होतीं. या भागांतील ९ गांवच्या शेतकऱ्यांनीं 'तालुका शेतकरी संघ' स्थापन केला आहे. कोणतीही तडजोड निघण्याचे आंतच कंपनीची उसाची लागण बंद पाडण्याची चळवळ सुरू झाली. कंपनीनें रीतसर पोलिसाकडे तक्रार करून संरक्षण मागितलें. ५० हत्यारी पोलीस, स्पेशल सबइन्स्पेक्टर, अ. डि. एस्. पी. वगैरे पोलीस फोर्स आला व ता. ३० पासून ता. २ जुलैपर्यंत ६२ लोकांना अटक करण्यांत आली आहे. त्यांना येथील कोर्टानें इं. पी. कोड कलम ४४७ व १४३ प्रमाणें ६ महिने व ३ महिने सक्तमजुरी आणि २०० व १०० रु. दंड अशी वेगवेगळ्या कलमाखालीं शिक्षा दिली. दंड न दिल्यास आणखी २ महिने स. म. भोगावयाची आहे.

कलेक्टर, श्री. एफ. एन. राणा, ह्यांच्या सल्ल्यावरून शेतकरी संघानें सत्याग्रह स्थगित केला आहे, अशी बातमी आहे. ज्यास्त खंड स्वीकारून, जमिनींच्या परतीची मागणी जमीन मालकांनीं सोडावी, असें त्यांनीं सुचविलें आहे.

---

### परीक्षा दोनदा घेणार

"गव्हर्मेंट डिप्लोमा इन् कोऑपरेशन अँड अकौंटन्सी"ची परीक्षा सध्या पुणें येथें वर्षांतून एकदा घेण्यांत येते, ती ह्यापुढें दोनदा, एप्रिलमध्यें व ऑक्टोबरमध्यें, घेण्यांत येईल.

स्थापना १९३६

युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३०-६-५१ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,४३,७६० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,६५,००० |
| ठेवी | रु. | ६७,११,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७९,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्ष | तीन अगर अधिक वर्षें |
|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. — एस. एच. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

दि

युनायटेड कमर्शिअल बँक लि.

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६७½ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका, व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या, व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

## टेलिफोनचा प्रसार : तुलनात्मक आकडे

जगांत एकूण ७,४८,००,००० टेलिफोन आहेत. त्यांपैकीं एकट्या युनायटेड स्टेट्समध्यें ४,३०,०३,८३२ टेलिफोन आहेत जागतिक लोकसंख्येच्या ६% लोकसंख्येच्या त्या देशांत एकूण टेलिफोनपैकीं ६०% टेलिफोन आहेत. दर १०० माणसांगणिक २८ टेलिफोन, असें प्रमाण तेथें पडतें. १० लाखापेक्षां अधिक टेलिफोन असलेले देश म्हणजे युनायटेड स्टेट्स, ग्रेट ब्रिटन, कॅनडा, जर्मनी, फ्रान्स, जपान, स्वीडन, रशिया, इटली व ऑस्ट्रेलिया हे होत. दर १०० माणसांगणिक १५ पेक्षां अधिक टेलिफोन सहा देशांत आहेत:— युनायटेड स्टेट्स ( २८·१ ), स्वीडन ( २३·९ ), कॅनडा ( २०·८ ), स्वित्झरलंड ( १९·९ ), न्यूझीलंड ( १९·१ ) आणि डेन्मार्क ( १६·९ ). उत्तर अमेरिका आणि युरोप येथील औद्योगिक देशांत टेलिफोन्सची दाटी आहे. परंतु, रहाणीचें मान निकृष्ट असलेल्या देशांतूनहि टेलिफोनचा प्रसार होत आहे.

खालीं दिलेल्या तक्त्यांत जगाची सात मोठ्या भूप्रदेशांत वांटणी केली आहे. उत्तर अमेरिकेंत जगांतील जमिनीच्या १६% जमीन असून जागतिक लोकसंख्येच्या ७% लोकवस्ती आहे, पण जागतिक टेलिफोन्सपैकीं ६१% टेलिफोन तेथें आहेत. उत्तर अमेरिका भूप्रदेशांतील टेलिफोनपैकीं ९४% टेलिफोन युनायटेड स्टेट्समध्यें आहेत.

### शहरांत टेलिफोनची दाटी


इतर सर्व देशांत, टेलिफोन मुख्यतः मोठ्या शहरांतूनच आढळतात. युनायटेड स्टेट्समध्यें मोठ्या शहरांतील टेलिफोनचें एकूण टेलिफोनशीं प्रमाण अत्यल्प आहे; म्हणजे खेडेगांवांतून टेलिफोनचा प्रसार तेथें पुष्कळच झालेला आहे. खालील तुलनात्मक आकडे पहा:–

| देश | प्रमुख शहर | त्यांतील टेलिफोनचें देशांतील एकूण टेलिफोनशीं प्रमाण.% |
|---|---|---|
| अर्जेंटिना | ब्यूनॉस एरिस | ६३ |
| ब्राझिल | रिओडीजानेरो | ३९ |
| फ्रान्स | पॅरिस | २६ |
| आयर्लंड | डब्लिन | ५७ |
| इटली | रोम | १९ |
| पोर्तुगाल | लिस्बन | ४२ |
| ग्रेट ब्रिटन | लंडन | ३० |
| युनायटेड स्टेट्स | न्यूयॉर्क | ७ |
| " | शिकॅगो | ४ |

मध्य अमेरिकेंतील निम्मे टेलिफोन मेक्सिकोंत असून त्यांपैकीं निम्मे टेलिफोन मेक्सिको शहरांत आहेत. क्युबांतील १,२२,६६८ टेलिफोनपैकीं ७०% टेलिफोन हवाना शहरांत आहेत.

युरोपांत दर १०० माणसांगणिक ३·५ टेलिफोन आहेत. युनायटेड स्टेटसमध्यें हें प्रमाण १९०४ मध्येंच पडलें होतें!

आफ्रिकेंत जागतिक भूप्रदेशाच्या २२% जमीन आहे, लोकसंख्येच्या ८% वस्ती आहे आणि टेलिफोनच्या १·२% टेलिफोन आहेत. आफ्रिकेंतील टेलिफोनपैकीं ८५% टेलिफोन उत्तर किनाऱ्यावरील पट्टींत व दक्षिण आफ्रिकेच्या युनियनमध्यें आहेत. इजिप्तमधील १,१५,५०० टेलिफोनपैकीं एक चतुर्थांश कैरो शहरांत आहेत.



### आशियाचा मागासलेपणा

आशियांत जागतिक लोकसंख्येपैकीं निम्म्यापेक्षां अधिक लोक रहातात, परंतु जागतिक टेलिफोनपैकीं फक्त एकपंचविसांश टेलिफोन आहेत. आशियांतील टेलिफोनपैकीं दोन तृतीयांश (१८,०२,५५८) एकट्या जपानमध्यें आहेत. जपानमध्यें दर १०० माणशीं टेलिफोनचें प्रमाण २·१४ पडतें, तें सबंध आशियांत मोठें आहे. त्याचे खालोखाल इस्राएलचा ( २·११ ) अनुक्रम लागतो. चीनमध्यें व भारतांत टेलिफोनचा प्रसार अत्यल्प आहे. आशियांतील देशांत टेलिफोन संख्येच्या दृष्टीनें चीन दुसऱ्या अनुक्रमाचा (२,२५,००० टेलिफोन ) देश आहे. परंतु तेथें दर १८२०लोकांना एक टेलिफोन असें अत्यल्प प्रमाण पडतें. भारताचा अनुक्रम तिसरा असून, त्यांत २१५० माणसांगणिक एक टेलिफोन आहे.

टेलिफोनच्या वापराच्या दृष्टीनें पहातां, अमेरिकेंत दरसाल दरमाणशीं ३७१ वेळां टेलिफोनचा वापर होतो. कॅनडांत ३६२, ग्रेट ब्रिटनमध्यें ६७, प. जर्मनींत ४३, फ्रान्समध्यें ३७, जपानमध्यें ६७ आणि स्वीडनमध्यें ३१३, असे इतर देशांबाबत आकडे आहेत. भारतासंबंधीं आकडे उपलब्ध नाहींत

### टेलिफोन्सची जागतिक वाटणी

( १ जानेवारी, १९५१ )

| भूप्रदेश | संख्या | जागतिक संख्येशीं प्रमाण % | दर १०० माणसांगणिक संख्या |
|---|---|---|---|
| उत्तर अमेरिका | ४,५९,३३,८०० | ६१·४ | २७·५ |
| मध्य अमेरिका | ५,५५,००० | ०·७ | १·१ |
| दक्षिण अमेरिका | १८,१५,००० | २·४ | १·६ |
| युरोप | २,१३,००,००० | २८·५ | ३·५ |
| आफ्रिका | ८,९५,२०० | १·२ | ०·५ |
| आशिया | २६,५५,००० | ३·६ | ०·२ |
| ऑस्ट्रेलिया न्यूझीलंड | १६,४६,००० | २·२ | ११·९ |
| एकूण | ७,४८,००,००० | १००·० | ३·१ |

### इंग्रजांना फ्रान्समध्यें तयार झालेली वीज मिळणार

फ्रान्समधील आल्प्स पर्वतांतील हैड्रो-इलेक्ट्रिक केंद्रांची वीज आणि मध्य इंग्लंडांतील कोळशावर तयार होणारी वीज जोडली जाऊन ग्रेटब्रिटनला फ्रान्समधील व फ्रान्सला ग्रेट ब्रिटनमधील वीज मिळूं शकेल, अशी योजना करण्यांत येत आहे. इंग्लिश खाडींत त्यासाठीं पाण्याखालीं तारा घालण्यांत येतील.

## जकातीचें उत्पन्न : २३० कोटी रुपयांचा नवा उच्चांक

१९५१–५२ मध्यें भारत सरकारच्या जकात खात्यानें २,३०,८८,४३,००० रुपये निव्वळ जकातीचें उत्पन्न वसूल केलें. १९५०–५१ चा हाच आंकडा १,५६,३२,७२,००० होता. यांत महसुली आणि संरक्षित स्वरूपाच्या अशा दोन्ही प्रकारच्या आयात कर मिळून एकूण १,४१,७५,०९,००० रुपये उत्पन्न आलें. मागील वर्षाचा हा आंकडा १,०७,१४,७७,००० रुपये होता. या वर्षी निर्यात करापासून ८९,६३,७२,००० रुपये उत्पन्न आलें, तर मागील वर्षी तें ४६,५९,०१,००० रुपये होतें. जमिनीवरील जकातीपासून ३,१९,९३,००० रुपये उत्पन्न आलें; मागील वर्षाचा हा आंकडा ४,३०,४६,००० रुपये होता. या वर्षी ४,८२,३६,००० रुपये रिफंड देण्यांत आला; मागील वर्षी हा आंकडा ३,१३,३५,००० होता.

### चोरट्या आयातीविरुद्ध उपाययोजना

अधिकारी वर्गानें चोरट्या आयातीस प्रतिबंध करण्यासाठी नियंत्रणाच्या उपाययोजना अधिक कडक केल्या आहेत. भारताची सरहद्द वाढल्यानें त्यांचें कार्यक्षेत्रहि वाढलें आहे. १९५१–५२ मध्यें जकात अधिकाऱ्यांनीं सुमारें १ कोटी रुपये किंमतीचा माल जप्त केला. समुद्रांत जलद संचार करणाऱ्या व शस्त्रांनीं सुसज्ज असलेल्या बोटी व जीप गाड्यांची तुकडी या कामीं वापरण्याची एक योजना आंखण्यांत आली असून ती अंमलबजावणीच्या अवस्थेंत आहे. नजिकच्या काळांत पॉंडेचरी-कालिकत सरहद्दीवर २६॥ मैल लांबीचें कांटेरी तारांचें कुंपण उभारण्यांत यावयाचें आहे. जकात अधिकाऱ्यांना अधिक प्रगत स्वरूपाची, माहिती टेहळणीविषयक पद्धतीचें शिक्षण देऊन खात्याची कार्यक्षमता वाढविण्याकरतां उपाययोजना करण्यांत येत आहे.

---

## हिंदी कंपन्यांकडे आगबोटींचा विमा उतरविण्यास प्रारंभ

### सिंद्या गटाचा पुढाकार

सिंद्या गटांतील कंपन्यांनीं त्यांच्या सर्व आगबोटींचा विमा यापुढें ( १ जुलै पासून ) हिंदी कंपन्यांकडेच उतरविण्याचें ठरविलें आहे. एकूण आठ हिंदी कंपन्यांत २२ कोटी रुपयांचें हें काम विभागलें जाईल. त्यामुळें २,२५,००० टनांच्या ५० लहान-मोठ्या बोटींचा विमा हिंदी कंपन्यांकडे येईल. आजपर्यंत, आगबोटींचा विमा अत्यंत जोखमीचा समजला जात असे व तो लंडनमध्येंच उतरविला जाई. ज्या हिंदी कंपन्यांना हें काम आतां मिळेल, त्या ती जोखीम ब्रिटिश, फ्रेंच, बेल्जिअन व डच कंपन्यांकडे री-इन्शुअरन्स द्वारां विभागून देतील. सहाजिकच त्या प्रमाणांत त्या देशांतील कामाहि हिंदी कंपन्यांस मिळेल. आगबोटींच्या युद्ध-धोक्याचा विमाहि हिंदी विमा कंपन्यांकडे उतरविला जाईल. त्यामुळें, हिंदी कंपन्यांचा दर्जा वाढण्यास मदत होईल. सिंद्या गटांतील कंपन्यांचें इतर हिंदी आगबोट कंपन्या अनुकरण करतील अशी अपेक्षा आहे.

---

### तेलशुद्धीचे कारखाने

स्टँडर्ड व्हॅक्युम ऑईल कंपनीच्या देखरेखीखालील तेल-शुद्धीचा ट्रॉम्बे येथील कारखाना पूर्वयोजनेपेक्षां आर्धी सहा महिने ( १ जुलै, १९५४ ) सुरू होईल. बर्मा शेलचा कारखाना १९५६ मध्यें सुरू होईल.

## पेट्रोलच्या खपास भारतांत प्रचंड वाव

" बर्मा ऑइल कंपनी येत्या पांच वर्षांत २ ते २½ कोटी पौंड भांडवली खर्च करणार आहे त्यांपैकीं कांहीं खर्च मुंबई येथें उभारण्यांत येणाऱ्या तेलशुद्धीच्या कारखान्यासाठीं आहे. भारतांत व पाकिस्तानांत कंपनीचा तेलाचे नवे साठे, शोधून काढण्याचा प्रयत्न चालू आहे. परंतु, अद्याप विहिरींत प्रत्यक्ष तेल आढळलेलें नाहीं. दिग्बोई ( आसाम ) येथील उत्पादनाचें व शुद्धीचें काम चालू आहे. चकवाल ( पं. पंजाब, पाकिस्तान ) येथेंहि कांहीं तेल उपसण्यांत येत आहे. भारतांत व पाकिस्तानांत पेट्रोलचा व तत्सम तेलांचा खप वाढत आहे. बर्मा ऑइल कंपनीचा खप एका वर्षांत २१% वाढला. अमेरिकेंत १९३८ सालीं पेट्रोल व तत्सम तेलें ह्यांचा खप दरमाणशीं ३०० गॅलन, ग्रेटब्रिटनमध्यें ५६ गॅलन आणि भारतांत एक गॅलन होता. १९५१ मध्यें तो खप वाढून अनुक्रमें ५७८ गॅलन, १०४ गॅलन, व तीन गॅलन झाला. भारतांतील रहाणीचा दर्जा वाढेल त्याबरोबर हा खपहि वाढत जाईल हें उघड आहे.

### पेट्रोल कराचा बोजा

" मेक्सिकोच्या आखातांतील पेट्रोलच्या किंमतीवर जागतिक किंमती मुख्यतः आधारलेल्या असतात. तेथील किंमत १९५१ मध्यें अगदीं थोडी वाढली, परंतु वहातुकीचे दर फारच वाढल्यानें पेट्रोलची विक्रीची किंमतहि अतिशय वाढली. आयात कर, एक्साइज पट्टी, विक्रीकर, इत्यादींमुळें पेट्रोलची गिऱ्हाइकांस पडणारी किंमत अधिकच वाढते. भारतांतील व पाकिस्तानांतील पेट्रोलच्या किंमतीपैकीं निम्मा भाग अशा करांचा असतो. हे कर वसूल करण्यास सोय असल्यानें सरकारला ते अत्यंत प्रिय होतात. परंतु, पेट्रोल व तत्सम तेलें ह्या चैनीच्या बाबी उरलेल्या नसल्यामुळें गिऱ्हाइकांस मात्र ते कर जाचक होतात. " :— बर्मा ऑइल कंपनीचे चेअरमन, सर केनेथ बी. हार्पर, ह्यांचा कंपनीच्या ग्लासगो येथील वार्षिक सभेंतील आढावा.

---

### हॉलिवुडमध्यें वेतनांत कपात

मेट्रो–गोल्डविन–मेयर ह्या हॉलिवुडमधील सर्वांत मोठ्या स्टुडिओंतील बड्या अधिकाऱ्यांनीं आपल्या वेतनांत २५ ते ५०% कपात कबूल केली आहे. ज्यांना दर आठवड्यास १,००० डॉलर्सपेक्षा जास्त पगार मिळतो, अशा सुमारें १०० अधिकाऱ्यांना ही कपात लागू होईल. नट–नट्या, निर्माते व डायरेक्टर्स ह्यांच्या वेतनांत कपात होणार नाहीं.

---


पुणें सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें शहर

## नोटीस

या बँकेच्या सन १९५२–५३ च्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची निवडणूक व्हावयाची आहे, त्यासाठी वैयक्तिक मतदारांची यादी तयार झाली असून ती बँकेच्या मुख्य कचेरींत व शाखा–कचेरींत नोटीसबोर्डावर निवडणुकीच्या नियम नं. ३ प्रमाणें लावली आहे. तरी निवडणुकीसाठी लायक उमेदवारांचीं नांवें सूचक व अनुमोदक यांच्या सहीसह व उमेदवाराच्या लेखी संमतीनें तारीख ९ ऑगस्ट, १९५२ रोजीं दुपारीं चार वाजण्यापूर्वी बँकेच्या मुख्य कचेरींत दाखल होतील अशा बेतानें पाठवावींत. सदर बाबत कोणास जास्त माहिती पाहिजे असल्यास त्यांनीं बँकेच्या कचेरीचे वेळांत चौकशी करावी, म्हणजे ती त्यांना देण्यांत येईल.

पुणें शहर, मो. वि. रबडे
दिनांक १०–७–५२. मॅनेजिंग डायरेक्टर.


---

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.